# रंग महसूली

**(आधुनिक विचित्र महसूली  शब्दकोश)**


**लेखक**

**शेखर नारायण गायकवाड**

# अ

## अपिल

- चूकीची बाजू असणा-या व्यक्तिने पैशाच्या जोरावर चालू ठेवलेला खटला.
- खालील न्यायालयाने अन्याय केल्यामुळे मागितलेली दाद.

## अतिक्रमण

- आपल्या मालकीच्या नसणा-या जागेवर रुबाब करुन व इतरांना दम देऊन प्रतिष्ठित व्यक्तिने केलेला जमिनीचा वापर.
- स्वतः अतिक्रमण करताना आपलीशी वाटणारी परंतु दुस-याने अतिक्रमण केल्यानंतर सरकारची आहे असे सतत ज्या जागेबद्दल वाटते ती जागा !

## अव्वल कारकून

- सामान्य जनतेला महसूल खात्यातील माहिती असलेले सर्वात बेरकी वाटणारे पदनाम.

## ॲन्डरसन मॅन्युअल

- हे मॅन्युअल पाठ आहे असे सांगणरे १००% महसूल अधिकारी असून त्यापैकी कोणीही हे मॅन्युअल अद्यापर्यंत पाहिलेले नाही. आपल्याला ज्ञान आहे हे दर्शविण्यासाठी हेच मॅन्युअल कोळून प्यायल्याची फुशारकी मारली जाते. ॲडरसन हा माणूस अतिशय हुशार होता या पलीकडे या ॲडरसनबद्यल बहुतेकांना काहीही माहिती नसते.

## अविश्वास ठराव

- दुस-यावर विश्वास ठेवण्यातील पहिले पाऊल.
- स्वतःचा पूर्वीचा विश्वास बदलून चूकीचा विश्वास ठेवण्याचे तंत्र.

## आस्थापना शाखा

- कर्मचा-यांची पदे संरक्षीत ठेऊन कर्मचा-यांना संकटात लोटणारी शाखा.
- सतत " आस्था" दाखवूनही "आपलेपणा" नसणारी शाखा.

# न

## निवडणूक कालावधी

- पुढारी ज्या काळात अधिका-यांशी आदबीने वागतात असा काळ.
- केव्हाही नोकरी जाईल एवढी जबाबदारी असणारा काळ.
- इतर सर्व कामांकडे दुर्लक्ष करण्याचा कालावधी.

# ऊ

## उपजिल्हाधिकारी

- "उप " शब्दामुळे जिल्हाधिकारी यांच्या सतत निकट असतो असा आभास निर्माण करणारे पदनाम.
- तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्यामधील "सॅडवीच".
- पर्यवेक्षण करण्याची अनेकवेळा जबाबदारी येवूनही ज्या गोष्टीचे पर्यवेक्षण करावयाचे आहे त्याबाबत काहीही माहिती न मिळणारा दुर्दैवी अधिकारी.

## उपायुक्त

- आयुक्ताचे निकटचे दुय्यम व अधिक पॉवरफूल पद.

## उप विभागीय अधिकारी

- विशेष भूसंपादन अधिकारी यांना ज्याच्याबद्दल सतत मत्सर वाटतो असा अधिकारी.
- सतत कामात असल्याचा यशस्वीपणे देखावा करु शकणारा अधिकारी.
- सतत वरिष्ठांचे आदेश व कनिष्ठांचे गा-हाणे ऐकावे लागणारे पद.

# ख

## खातेपुस्तिका

- एक फसलेला उपक्रम.

## खुलासा

- केलेल्या चूकीचे समर्थन देणारा अहवाल.

# ग

## गावठाण

- प्रतिष्ठितांच्या संगनमताने अतिक्रमण करता येईल अशी गावातील सार्वजनिक व मोकळी जागा.
- ख-या  अर्थाने स्वतःची जागा सोडून घाण करण्यास उपलब्ध असणारी सरकारी मोकळी जागा.
- गरजू व्यक्तिने राहण्यासाठी जागा मागितल्यावर ताबडतोब सार्वजनिक कामासाठी त्याच जागेची मागणी आठ दिवसात आली नाही तर ती जागा गावठाणाची नाही असे समजावे !

## गायरान

- गवताची काडी देखील न उगवणारी, गावातील जनावरांना चरण्यासाठी ठेवलेली सार्वजनिक जागा.
- शासनाच्या मालकीची गावातील मोकळी जागा, जी गावातील प्रतिष्ठित आपल्या नातेवाईकांनी अतिक्रमण करावे म्हणून वापरतो .
- हक्काने  अतिक्रमण करण्याची गावातील जागा.

## गांव

- जिथे राजकारण चालते असा सर्वात लहान भौगोलिक घटक.

## ग्रामपंचायत

- सतत गावाचा विचार करणारी परंतु एकाही ग्रामस्थाचा विचार न करणारी संस्था!

# ग

## गोपनीय अहवाल

- साहेबांची पूर्वग्रहदूषित  दृष्टी व्यक्त करण्याचा मार्ग.
- खुषामतखोर कर्मचा-यांना अधिकृत मान्यता देण्याचा एक मार्ग.
- चांगल्या कर्मचा-यांना मिळणारा एकमेव दिलासा.

## गोदाम

- तूट दाखविण्यासाठी धान्य जिथे आणले जाते व गरज नसलेल्या असंख्य लोकांना जिथून धान्याचे वाटप होते ते ठिकाण.

## गोदामपाल

- तहसिल कार्यालयाचा व आपला काहीही संबंध नाही असे दाखविणारा आधुनिक दामाजी.

## ग्रामरस्ता

- गावठाणातील सर्वात ओबडधोबड व उंच सखल भाग.
- जवाहर रोजगार योजनेतून खराब केलेली पायवाट.
- दरवर्षी गटार दुरुस्तीवर खर्च करुन जो मुख्य रस्ता खराब अवस्थेत ठेवला जातो तो.

## गणवेश भत्ता

- गणवेश न वापरता तो धुण्यासाठी घेतला जाणारा भत्ता !

# च

## चावडी

- ७/१२ उतारा देण्याची व अडविण्याची जागा.
- सतत बंद असणारी जागा.
- ज्या इमारतीकडे पाहिले तरी शेतक-यांच्या पोटात गोळा व खिशावर नकळत हात पडतो ती इमारत.
- संख्या शास्त्रातील बहुसंख्य आकडेवारी जेथून निर्माण होते ती जागा.

## चौकशी अहवाल

- अर्जदाराची मागणी व निर्णय यातील तफावत/विसंगती दर्शविणारी माहिती.

## चौकशी

- निर्णय लांबविण्यासाठी उचललेल पाऊल.
- अर्जदाराची मागणी व न्याय यामधील अंतर.

# ड

## ड्रायव्हर

- चांगले पद मिळाल्यावर सुध्दा आणखी दुसरी चांगली गोष्ट साहेबास आवश्यक वाटत असेल तर तो म्हणजे ड्रायव्हर.
- साहेबांना महत्वाच्या कामासाठी लवकर पोहोचायचे असताना संथ गतीने गाडी चालविणारा व इतर वेळी जोरात गाडी हाकणारा इसम.
- रस्त्याकडे पाहत-पाहत सतत साहेबांच्या बोलण्याकडे कान करणारा व साहेबांचा सर्व क्षेत्रातील "स्पीड" जाणणारा जाणकार.
- बहुतांशी आयुष्यभर गाडी चालवून देखील गाडीच्या दुरुस्तीबाबत काहीही ज्ञान नसणारा परंतू कार्यालयात काय चालले आहे हे संपूर्णपणे माहित असणारा फिरता इसम.
- साहेबांची इमेज गावोगाव नेणारा चालक.
- गाडी चालवता चालवता साहेबांचे ऑफीस देखील आपणच चालवतो असा नागरिकांपुढे आव आणणारा चालक.
- बदलून गेलेल्या साहेबांच्या आठवणी काढून बदलातील सातत्य ठेवणारा सरकारी कर्मचारी.

# ज

## जबाब

- अर्जात दिलेले गा-हाणे पुन्हा कारकुनाने वरिष्ठांच्या समोर लिहून घेऊन निर्माण केलेला अनावश्यक कागद.

## जिरायत जमीन

- कागदोपत्री बागायत जमीन आहे असे सिध्द करता येत नाही अशी जमीन.

## जमिनीचे एकत्रीकरण

- जमिनीच्या ऐवजी ७/१२ चे एकत्रिकरण.
- जमिनीचे तुकडे आहेत तसेच ठेवून कागदावर जमीनी एकत्रित करण्याचा अभिनव उपक्रम.
- समाजात पुढील ३० वर्षे भांडणे/दावे होण्याची हमखास सोय.

## जमीन महसूल

- वसुली व लेखा परिक्षण यावर तीनपट रक्कम खर्च होणारा जमिनीवरील कर.

# झ

## झाडतोड परवानगी

- उशिरा सुचणारे शहाणपण.
- बांधावरील झाडे आपलीच आहेत असे समजून व तोडून त्यानंतर परवानगी मागितली जाते.

# ट

## टंकलेखन यंत्र

- कर्मचा-याच्या मनात येईल तेव्हा बिघडणारे हक्काचे, साधे टायपिंग करायचे मशिन.
- टायपिंग केल्यावर हाताने दुरुस्ती करुन शासकीय कामकाज चालविले जाते.

# त

## तरतूद

- काम टाळण्यासाठी अधिकारी जे नाही असं सांगतात ते.
- जर चुकून तरतूद असेल तर मग बजेट नाही असे सांगितले जाते.

# द

## दैनंदिनी

- अधिका-यांची  दररोजची दैनावस्था वरिष्ठांच्या सतत लक्षात यावी म्हणून पाठविण्यात येणारे मासिक.

## दवंडी

- प्रत्यक्षात दवंडी अस्तित्वात नसूनही प्रत्येक ठिकाणी दवंडी रजिष्टरमधील दवंडी दिल्याचा उतारा हजर करण्याची कालबाहय प्रथा अद्यापही चालू आहे.

# न

## नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी

- अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयानुसार वैद्यक व्यवसायी  म्हणून नोंदणी झालेला व कर्मचा-यास रजा पाहिजे असताना आजारी असल्याचे प्रमाणपत्र देणारा व्यवसायी.

## नोदणी शाखा

- टपाल एकदा नोदवून कायमचे हरवून टाकणारी शाखा.

## नकाशा

- आपल्याला पाहिजे असणरी माहिती हमखास अंधूकपणे छापलेला, चूकीचा असणारा व सतत गुंडाळा होणारा कागद.

## नियम

- काम टाळण्यासाठी महत्वाचे कारण.
- जे वाचून सर्व कामकाज चालते व जे मोडण्यासाठी लोकप्रतिनिधीचा दबाव येतो असे.

## निवासी नायब तहसिलदार

- अनिवासी तहसिलदार.
- तहसिलदारांचा कर्दनकाळ .
- संपूर्ण अविश्वास असताना सुध्दा तहसिलदार ज्याच्याकडून सतत काम करुन घेण्याचा प्रयत्न करतात असा तहसिलदारांचा कनिष्ठ अधिकारी.

# प

## परिपत्रक

- जे पत्र संपूर्ण वाचल्यावर एखादी गोष्ट करावी की करु नये अशा संभ्रमात अधिकारी पडतात ते. याची भाषा अगम्य व सुंदर असते. त्यात अनेकदा ज्या अर्थी व त्या अर्थी या शब्दांचा उपयोग केलेला असतो. अनेकदा यातील चूकांसाठी शुध्दीपत्रक काढले जाते व ते वाचल्यावर नक्की कोणती चूक दुरुस्त करण्यात आली आहे ते समजून येत नाही. "अमुक" सर्क्यूलर आपण वाचले आहे का? असा प्रश्न दिवसातून पाच-सहा वेळा समोरच्या अधिका-यास विचारला की प्रश्न विचारणा-यास "हुशार अधिकारी" असे संबोधले जाऊ लागते.

## पदोन्नती

- दूर्मिळ ,दूर्दम्य आशावाद. बरोबरीच्या मित्रांना सतत येणार येणार म्हणून सांगितले जाते ती अशक्य कोटीतील गोष्ट.
- वरच्या पदावर गेले की, काम कमी होईल या आशेने मनाची समजूत घालण्याची सबब.
- ही गोष्ट मिळाल्यावर सर्व मित्र "हा आता पूर्वीसारखा राहिला नाही" असे म्हणतात.
- पी.एफ., जी.आय.एस., देणगी, गणपतीची वर्गणी इत्यादी जास्त दयावी लागणारे परंतू बोनसला मुकावे लागणारे उच्च पद.

## पंचनामा

- बाहेरचे पाच लोक बोलावून (पंचासमोर) केलेला वस्तुस्थितीचा विपर्यास.

## प्रपत्र

- पुन्हा पुन्हा चूकीची माहिती दुरुस्त करुन पाठविण्याची सोय असणारे रकाने असलेले विवरणपत्र.

## प्रोबेशनर

- कोणतीही जबाबदारी नसणारा, सर्व ठिकाणी संचार असणारा, कशावरही बोलणारा शिकाऊ अधिकारी.
- दैनंदिनी वेळेत पाठवू शकणारा (काम नसल्यामुळे किंवा फक्त तेवढेच काम असल्यामुळे ) एकमेव महसूल अधिकारी.

# प

## पोलीस पाटील

- पोलीस अधिका-यांचा बंदोबस्त करणारा मुलकी नोकर.

## पदग्रहण कालावधी

- कर्मचा-याला आपल्या मनासारखे पद मिळेपर्यत मूळ ठिकाणापासून नवीन नियुक्तीच्या ठिकाणापर्यत प्रवासास लागलेला अवधी.
- दबाव आणून इच्छित पद मिळण्यासाठी लागणारा कालावधी.

## पाणी टंचाई

- गावातील राजकारणामुळे ५० वर्षात झालेली भारतातील खेडयातील प्रातिनिधीक दुदैवी परिस्थिती !

## प्रभारी अधिकारी

- नवीन पदामुळे तात्पुरता भारीत झालेला कनिष्ठ अधिकारी.

## पुरावा

- एखादया व्यक्तीने काम न करण्यासाठी मागितली जाणारी कागदपत्रांची यादी.

# फ

## फेरफार

- जनतेच्या हितसंबंधात फेरफार करण्याचा कागद.
- हा महसूल खात्यातील सर्वात महत्वाचा नमुना  असून तो तलाठी याच्या कामकाजाचा भाग असल्यामुळे तलाठयास लोक अतिशय घाबरतात.
- यामध्ये व्यक्तिने प्राप्त केलेल्या अधिकार व हितसंबंधाची नोंद केली जाते.
- किती व कोणता हक्क प्राप्त झाला आहे अगर झालेला नाही हे अनेकदा मर्जीनुसार मजकूर गाळून अगर वाढवून तलाठी ठरवित असतो.
- एखादा फेरफार एखादयाच्या जीवनात फार मोठा फेरफार घडवून आणू शकतो.

# ब

## बदली

- त्रैवार्षिक पिडा.
- एका ठिकाणचे लोक कंटाळले की, दुस-या ठिकाणच्या लोकांनाही कंटाळा आणून समाजवाद आणण्यासाठी उचललेले पाऊल.

## बारनिशी

- आवक-जावक पत्रव्यवहारासाठी ठेवलेली एकच नोंदवही.
- एकदा नोद झाल्यावर पुन्हा कधीही या नोंदवहीचा संदर्भ शोधण्यासाठी उपयोग होत नाही.

# भ

## भूमापन अधिकारी

- ज्याला गुंठे, एकर, हेक्टर, आर, बिघा यातला फरकत तात्काळ सांगता येत नाही असा आयुष्यभर जमीन मोजणारा निष्णात अधिकारी.
- शेजारच्या दोन शेतक-यांपैकी कोणीही दुस-याच्या शेतात अतिक्रमण केले आहे असे सिध्द करता येईल असा नकाशा तयार करणारा तज्ञ !

## भूमी अभिलेख

- जमिनीसंबंधीच्या कोणत्याही कायदयानुसार निर्माण झालेल्या कागदपत्रांची व नकाशांची रद्दी.

## भेट नोंदवही

- यापूर्वी आलेल्या कित्येक वरिष्ठ अधिका-यांनी सांगून सुध्दा कोणकोणती कामे करण्यात आली नाहीत हे दर्शविणारी नोंदवही.
- तलाठयाचे प्रगतीपुस्तक.

# भ

## भूमापन क्रमांकाचा पोट विभाग

- तलाठयाने स्वतःच्या मर्जीने , स्वतःच्या मर्जीतल्या माणसाच्या जमिनीच्या  बाबतीत केलेला गटाचा तुकडा.

## भविष्यनिर्वाह निधी

- कर्मचा-याकडून प्रत्येक वर्तमानकाळच्या समस्येसाठी काढली जाणारी भवितव्यासाठी राखून ठेवलेली रक्कम.

## भूमापन क्रमांक

- ७/१२ वरील एवढा एकमेव आकडा सामान्य लोकांना समजतो.

# म

## महसूल अधिकारी

- ज.म.वसुलीचे काम सोडून इतर सर्व कामे पार पाडणारा सरकारी कर्मचारी.

# र

## रजा राखीव उप जिल्हाधिकारी

- पदनामावरुन कोणतेच काम नाही असे सतत वाटत राहणारे परंतू प्रत्यक्षात वाटेल ते काम करावे लागणारे पद.

## राजस्व अभियान

- वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवलेल्या प्रकरणांची धूळ झटकून पुन्हा व्यवस्थित ठेवण्याची मोहिम.

# र

## रास्त भाव धान्य दुकान

- महिन्यातील २८ दिवस बंद असणारे धान्य दुकान.

## रेस्ट हाऊस (विश्रामधाम गृह )

- जिथे महसूल अधिका-यांना एक मिनिटही "रेस्ट" घेता येत नाही अशी जागा.
- दुस-याला रेस्ट मिळावी म्हणून बाहेर सतत "अनरेस्ट" असणारी इमारत.
- इथे जे काही काम महसूल कर्मचा-यांना करावे लागते त्यास बंदोबस्त उर्फ सरबराई असे नाव आहे. वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींना पाहिजे ती गोष्ट देऊन त्यांचा इथे बंदोबस्त केला जातो.

## रेकॉर्ड रुम (अभिलेख कक्ष)

- कोणीही वाचत नाही परंतू नियमानुसार फेकून देता येत नाहीत असे कागद ठेवण्याची जागा.

# ल

## लेखाधिकारी

- वित्तीय नियम फारसे माहित नसलेला परंतू वित्तीय दृष्टीने सर्व शासकीय कामकाज पाहणारा.
- कोणतीही जबाबदारी न घेणारा चतूर शाख अधिकारी.

# व

## वतनदार

- ३ पट, ६ पट, १० पट, २० पट, २६ पट अशा आकडयांच्या कचाटयात सापडलेला ए के काळचा मोठा माणूस.
- जमीन विकताना आपण कशासाठी वतनदार झालो असे वाटणारा खातेदार.

## वाडीचे महसूल गावांत रुपांतर

- राजकारणाचे एकत्रीकरण.
- विरोधकांचा ग्रामपंचायत मत.

## विशेष भूसंपादन अधिकारी

- भूसंपादनाचे अहोरात्र काम करणारा विशेष उप जिल्हाधिकारी. या पदावर गेला की, माणूस चिडचिडा होतो, त्यास अन्न गोड लागत नाही. विशेषत : उप विभागीय अधिकारी यांचा तिरस्कार हे पदाचे विशेष लक्षण मानले जाते.

  या पदावरील सर्वांना अत्याधुनिक पध्दतीने म्हणजे नंबरवरुन (नं.२,३,४,६ .....इ.) असे ओळखले जाते. कोणताही खातेदार जमीन संपादनाविषयी तक्रार घेऊन जिल्हाधिकारी यांचेकडे आला तरी त्याचे काम आपणांकडे नसून दुस-या नंबरच्या अधिका-याकडे असल्याचे स्पष्टपणे सांगून कार्यालयीन वेळेत पाहिजे तेव्हा घरी जाऊ शकणारा, सुट्टी उपभोगू शकणारा सर्वात बिनधास्त महसूली अधिकारी.

# श

## शिपाई

- कोणतीही जबाबदारी नसलेला सर्वात पॉवरफूल कर्मचारी.
- वर्ग-४ चा अधिकारी.
- साहेबाला कोणी भेटावे व कोणाला भेटता येणार नाही हे ठरविणारा व्दारपाल.
- साहेबांची सर्वात "आतली" माहिती असणारा "बाहेरचा " माणूस.

## शिरस्तेदार

- तहसिलदारांचा साहेब परंतू प्रांताचा नोकर नाही असा.
- अव्वल कारकून असून तहसिलदारांना कडक सूचना देणारा गैरहजेरीतील प्रांत.

## शेरेबुक

- मागील शेरे वाचून ते पुन्हा लिहावयाची पुस्तिका.
- शेरेबुक एकदा लिहिल्यावर पुन्हा पुढील अधिकारी येईपर्यंत उघडले जात नाही.

## शासकीय निवासस्थान

- ज्या निवासस्थानात गेल्यावर बेडरुमच्या जागेवर स्वयंपाकघर व स्वयंपाकघराच्या ऐवजी त्या ठिकाणी स्वच्छतागृह पाहिजे होते असे सतत वाटत राहते अशी निवासाची जागा!

# स

## समजूतीचा नकाशा

- सर्कलने साहेबांच्या मनाची समजूत काढण्यासाठी ओढलेल्या रेघा !
- पाहणी केल्यावर जर जागेशी तो जुळत नाही, असे दिसले तर कसाही कागद फिरवून जागेशी तंतोतंत जुळणारा जादूई नकाशा.

## संयुक्त खातेदार

- दुस-याची जमीन, दुस-याच्या पैशाने कसणारा जमीन धारक.

## साहेबांचा शिपाई

- शिपायांचा साहेब.
- साहेबाच्या अंगातील ५०% वारे अंगात असलेला शासकीय कर्मचारी.

## सेवापुस्तक

- सेवा न  केलेल्या कालावधीचा म्हणजे रजेचा हिशोब ठेवले जाणारे पुस्तक!

## संवर्ग

- एकमेकांत स्पर्धा करणारा समाजातील नोकरी करणारा घटक.
- प्रमोशनसाठी स्पर्धा असणारा व अर्थिक उन्नतीमध्ये मत्सर असणारा सरकारी नोकरी करणारा, एकच वेतनश्रेणी लागू असणारा वर्ग.

## सुट्टी

- महसूल खात्यातील अत्यंत दूर्मिळ गोष्ट.
- ज्या दिवशी साहेबाला काम करण्याचा दुप्पट उत्साह असतो असा दिवस.

# स

## स्टेनोग्राफर (लघुलेखक)

- पुन्हा-पुन्हा शॉर्टहँडमध्ये चूकीची माहिती घाईघाईने उतरुन घेणारा व नंतर अर्थ लावत बसणारा अत्यावश्यक शासकीय कर्मचारी.
- शॉर्टहँडमध्ये लिहून परत साहेबांना तो शब्द कोणता आहे हे विचारणारा तज्ञ कर्मचारी.
- गैरहजेरीतील साहेब.
- उदा. साहेबांनी " अपील मान्य करण्यात आले आहे" असा निर्णय दिला असता "अपील अमान्य करण्यात आले आहे" असे टायपिंग करुन घाईघाईने साहेबांची सही घेतल्यामुळे अनेक महसूल अधिकारी गोत्यात आल्याची उदाहरणे आहेत.

## स्थायी आदेश फाईल

- कधीही न वाचता कायम स्वरुपी आदेश साहेबांच्या हितासाठी ठेवले जातात अशी फाईल.
- या फाईलचे सर्वात मोठे वैशिष्टय म्हणजे तिला कधीही अद्यावत सूची केली जात नाही.

## सक्षम प्राधिकारी

- सर्व अधिकार असणारा परंतू कोणताही निर्णय स्वतंत्रपणे घेण्यास घाबरणारा प्राधिकारी.

## स्थायी पद (कायम)

- असे पद जे मिळाल्यावर साहेबांना घाबरणे ८०% ने कमी होते.

## साझा किंवा सझा

- तलाठी ज्या गावामध्ये केव्हाही असू शकतो परंतू प्रत्यक्षात कधीही सापडत नाही असा गावांचा गट.
- तलाठयाचे पळण्याचे सिमांकन दर्शविणारा भाग.
- एकाच तलाठयाकडील अशा गावांचा समूह की जेथे चौकशी केल्यावर "तलाठी भाऊसाहेब आत्ताच येऊन गेले" असे सांगितले जाते.

# क

## कोतवाल

- महसूल खात्यातील सर्वात जास्त काम करणारा कर्मचारी.

## कमीशनर

- विभागीय आयुक्त.
- तहसिलदार व उप जिल्हाधिकारी यांच्या बदल्या करणारा अधिकारी.
- कधी तरी कमीशन जिल्हयात येतात तेव्हा.

## कलेक्टर

- सतत कामात व्यग्र असणारा, सुट्टीत काम करणारा, कोणाचेच न  ऐकणारा, विनंती करुनही हमखास गैरसोयीच्या ठिकाणी बदली करणारा जिल्हयातील वरिष्ठ अधिकारी.

## कूळ व आधुनिक कूळ

- संगनमताने जमीन कसणारा इसम.
- जमिनीचे सर्व शेजारी "हाच इसम" जमीन कसतो असे ज्याच्याबद्दल तो जमीन कसत नसताना देखील सांगतात असा वजनदार इसम.